महावितरण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email :ciro@mahadiscom.inwebsite : www.mahadiscom.inदूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

सी. आय. एन. नं. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/कोव्हीड सहाय्य/८६९१ दिनांक २२.०४.२०२१

# परिपत्रक

**विषय :** कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे दुर्दैवाने मृत्यू झाल्यास सानुग्रह सहाय्य अदा करण्याच्या कालावधीस मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दि.२९.०५.२०२०
२. औसंवि/ब/कोव्हीड सहाय्य/११५४५ दि.१९.०६.२०२०
३. महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दि.१४.१०.२०२० अन्वये दि. ३१.१२.२०२०.
४. औसंवि/ब/२३०११, दि.२२.१२.२०२०.

*********

राज्यामध्ये कोव्हीड-१९ (Covid -१९) विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने, कर्तव्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्राठबळ देण्याकरीता तसेच या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा कोव्हीड-१९ या विषाणूच्या संसर्गाने दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना रु.५० लक्ष इतक्या रकमेचे सर्वकष वैयक्तिक विमाकवच / सानुग्रह सहाय्य देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयान्वये दि. २९.०५.२०२० रोजी घेतलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये सानुग्रह सहाय्य रकमेस दिलेली दि. ३०.९.२०२० च्या तारखेस शासनाने महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दि.१४.१०.२०२० अन्वये दि. ३१.१२.२०२० पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाने दुर्देवाने मृत्यू झालेल्या अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगार व सुरक्षारक्षक यांना महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर महावितरण कंपनीतील सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगार व सुरक्षारक्षक यांना सानुग्रह सहाय्य म्हणून रु. ३० लक्ष (रु. तीस लक्ष मात्र) मंजूर करण्यात आले आहे. त्याबाबतचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/कोविड सहाय्य/११५४५ दि.१९.०६.२०२० प्रसारीत करण्यात आलेले आहे.

३. महावितरण कंपनीमधील कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना उपरोक्त संदर्भ क्र. ०२ मध्ये नमूद केल्याव्यतिरीक्त गट मुदत जीवन विमा योजनेतंर्गत रु. २० लक्ष रकमेची जीवन विम्याची रक्कम M/s India first life insurance company Ltd. कंपनीमार्फत योग्य त्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर अदा करण्यात येते.

४. महावितरण कंपनीमध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगार व सुरक्षारक्षक हे आपल्या आरोग्याची जोखीम घेऊन, **फ्रंटलाईन** कर्मचाऱ्यांप्रमाणेच अहोरात्र काम करत असून, सदर आजाराची लागण होऊन कर्मचाऱ्याच्या मृत्यूचे प्रमाण पाहता अधिकारी / कर्मचारी तसेच मानवतेच्या दृष्टीकोनातून बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार व सुरक्षारक्षक यांना देखील सानुग्रह सहाय्य देण्याच्या कालावधीस दि. ३१.१२.२०२० नंतर मुदतवाढ देण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

५. याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त)/(संचलन)/(वाणिज्य)/(प्रकल्प)/(मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन **कंपनीतील अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगार व सुरक्षारक्षक यांना सानुग्रह सहाय्य रु. ३० लाख देण्याकरीता दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३०.०६.२०२१ पर्यंत मुदतवाढीस मंजूरी दिली आहे.**

**अ) महावितरण कंपनीतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याबाबतची कार्यवाही :**

१. यापूर्वी कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दुदैवाने मृत्यू झाल्यास सानुग्रह सहाय्य रु. ३० लाख अदा करण्याबाबतचे सविस्तर परिपत्रक क्र. औसंवि/ब/कोविड सहाय्य/११५४५ दि.१९.०६.२०२० अन्वये प्रसारीत करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकामधील अटी व शर्ती कायम ठेवण्यात आलेल्या असून, त्याच धर्तीवर सदर सानुग्रह सहाय्य अदा करण्यात यावे.

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/२३०११, दि.२२.१२.२०२० अन्वये मृत्यूमूखी पडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना द्यावयाच्या सानुग्रह सहाय्य रु. ३० लाखांपैकी काही रक्कम पोस्ट ऑफीसच्या विविध योजनेत वितरण करण्याची कार्यपध्दतीत कोणताही बदल करण्यात आलेला नसून, त्याच पध्दतीने सदर रक्कम अदा करण्यात यावी.

**ब) महावितरण कंपनीमधील बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना आणि सुरक्षारक्षकांसाठी सानुग्रह सहाय्य देण्याची कार्यपध्दती :**

महावितरण कंपनीतील बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत कंत्राटी कामगार आणि सुरक्षारक्षकांना रु.३० लाख सानुग्रह सहाय्य रक्कम संबंधीत ठेकेदारामार्फत अदा केल्यानंतर कंपनीमार्फत संबंधीत ठेकेदार संस्थेस सदर रक्कम या कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/कोविड सहाय्य/११५४५ दि.१९.०६.२०२० अन्वये अदा करण्यात येत होती. मात्र कंत्राटदार संस्थेची आर्थिक असक्षमता पाहता सदर बाह्यस्त्रोत कामगारांना तातडीने सानुग्रह सहाय्य मिळावे यादृष्टीने याकरीता सदर कार्यपध्दतीत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

बाह्यस्त्रोत कामगार व सुरक्षारक्षक यांना सानुग्रह अनुदान हे प्रथम कंपनीमार्फत कंत्राटदार संस्थेस अदा करावे व तद्नंतर तातडीने कंत्राटदार संस्थेने संबंधीत कोरोनामुळे मृत्यू झालेल्या बाह्यस्त्रोत कामगार/ सुरक्षारक्षक यांना सदर सानुग्रह सहाय्य रक्कम रु. ३० लक्ष विहीत मुदतीत म्हणजेच ७ दिवसात अदा करण्यात यावी. सदर रक्कम बाह्यस्त्रोत कामगार / सुरक्षारक्षक यांच्या बँक खात्यावर जमा होईल याबाबत कार्यवाही करावी.

यासोबत खालील सुचनांचे पालन करावे.

१. कंत्राटदाराने परिपत्रकासोबत जोडण्यात आलेले (Annexure-I) हे रु.५००/- च्या हमीपत्र न्यायिकेतर मुद्रांकावर (Non Judicial Stamp Papar) करुन मुख्य मालकाच्या संबंधीत नियंत्रण अधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

२. हमीपत्र सादर करताना या कार्यालयाने यापूर्वी प्रसारीत केलेले संदर्भ क्र. २ व ३ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन, सोबत जोडून सादर करण्यात यावे.

सदर परिपत्रक हे कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(संजय रा. ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

**Annexure – I**

"I, the contractor named ________________________with whom Shri/Smt._____________________was working and was engaged as contract employee on your establishment has sad demise due to COVID-19 infection as shown in his death certificate. He/she died while he/she was engaged with your organisation. As per directives given by your establishment regarding Covid-19 Ex-gratia Assistance which was extended to the contract employee. He/She is entitled for payment of Rs. 30 Lakhs as Covid-19 Ex-gratia Assistance as per directives by your establishment. In order to claim his/her benefit, I have submitted all relevant documents to the controlling officer. I am to state that as per the directives given, I am required to pay Rs. 30 Lakhs to my employees and then claim re-imbursement from your office. However, I am unable to arrange fund of Rs. 30 Lakhs for payment to my deceased employees, due to my financial crisis. I, therefore, request your establishment to make me advance payment and that will be paid to the deceased employee. I undertake entire responsibility of payment and shall furnish all proof of payment to the family member of the deceased contract employee to MSEDCL.. I undertake to provide you the post-dated cheque in favour of nominee of the deceased contract employee after receipt of advance payment from your establishment. I shall be solely responsible for the payment of ex-gratia advance to the nominee of the deceased contract employee."

Name of Surety: Name of Contractor:

Sign of Surety: Sign of Contractor:

Date: Date:

Chief Industrial Relations Officer
M.S.E. Distribution Co. Ltd.
"Prakashgad", Bandra (East)
Mumbai -400 051.